www.youvaworld.com

Date : Page :

Topic :

कु. वैशाली जलवडे

श्री चक्रवर्ती,

Roll No - 576.

Seen

Seen

# अनुक्रमणिका

| अ.न. | विषयसुची |
|---|---|
| १) | प्रस्तावना |
| २) | स्त्रीयांची चळवळ |
| ३) | उद्दिष्ट्ये |
| ४) | आभार |
| ५) | ऋणनिर्देशक |

ARTS & COMMERCE ... Tal. ... Dist. ... (M.S.) ...

વિષય

ઝરી ખળખળ

પાઠ - ૧૬

# प्रस्तावना

इतिहास विषयाची गोडी वाढीस लागण्याचे महत्वाचे व एक प्रभावी माध्यम म्हणजे इतिहास प्रकल्प होय. प्रस्तुत इतिहास विषयाचा गट प्रकल्प तयार करताना आमच्या गटातील विदयार्थ्यांमधील संशोधन वृत्ती व विचार क्षमता वाढीस लागली. आम्ही सर्वांनी एकत्र येवून हा प्रकल्प तयार केला. त्यामुळे आमच्या मधील एकता वाढली. तसेच या प्रकल्पामुळे आम्हाला सदर विषयाची अन्य बहुमोल माहिती व बरेचसे ज्ञान प्राप्त झाले. याशिवाय प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आमचे विषय शिक्षक प्रा. श्री. आर. एम. घार्गे व प्रा. श्री. व्ही. बी गुजर यांनी बहुमोल व योग्य मार्गदर्शन केले. त्यांच्या सहकार्यामुळे व आम्हा सर्वांच्या प्रयत्नातून सदर प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यात आम्हाला यश मिळाले.

Scanned with CamScanner

# उद्दिष्ट्ये

1) १९ व्या शतकात भारतामध्ये स्त्रीयांच्या झालेल्या चळवळी बाबत माहीती जाणून घेणे.

२) भारतीय स्त्री- चळवळीचे स्वरूप जाणून घेणे.

३) स्वातंत्र्यानंतर झालेल्या स्त्री- चळवळीची वाटचाल कशी होती हे जाणून घेणे.

४) स्त्रीयांच्या आर्थिक विकास कसा होईल याविषयी विचार करणे.

५) स्वातंत्र्योत्तर स्त्रीयांच्या असलेल्या समस्या जाणून घेणे.

Scanned with CamScanner

# स्त्री चळवळीची वाटचाल :-

स्वातंत्र्यानंतरच्या त्यांचा पहिला लढा लढला तो हिंदू कोडबालीसाठी भारतीय राज्यघटनेने त्यांना पुरुषां-बरोबरच हक्क बहाल केले. स्त्रीयांच्या समानता प्रधान करण्या-साठी हिंदु कोड बीलची रचना करण्याचे काम १९४१ साली बी. एन. राव यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमून सुरु केले होते. या हिंदू कोड बिलाला आकार देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. हे बील स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा होते. घटस्फोट, पोटगी, एकपत्नीत्व, स्त्रीयांचा वारसा हक्क (पित्याच्या इस्टेटीत मुलाबरोबरीचा हक्क) विवाह, (आंतरजातीय विवाह व विधीपूर्वक लावलेले विवाह, नोंदणीपद्धतीने केलेले विवाह यांना कायदेशीर मान्यता), दत्तक विधान, (मुल दत्तक घेण्याचा अधिकार) असे बिलाला सनातनी विचारांच्या लोकांनी मोठा विरोध केला. या विरोध कर्त्यामध्ये राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद ही होते. हे बील मंजूर व्हावे म्हणून स्त्रीकार्य-कर्त्या व समाजसुधारक यांनी या बिलाला भक्कम पाठींबा दिला. मोठ्या विरोधानंतर हे बील चार विभागात पारित करण्यात आले. हिंदु विवाह कायदा, हिंदु वारसाहक्क कायदा, हिंदु अज्ञान दशा व पालकत्व कायदा आणि हिंदू दत्तक व प्रतिपाळ कायदा. हे बिल मंजूर व्हावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदे मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. हे बील मंजुर करून घेण्यासाठी देशभरातून स्त्रियांनी लढे उभारले.

# स्वतंत्र भारतात स्त्री प्रश्नाचे स्वरुप व कार्यपद्धती बदलली :-

स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी स्वतंत्र भारतात स्त्रियांनी लढे उभारले. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये पंचवार्षिक योजनामधून महिला आणि बालकल्याण यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद झाल्याने स्त्रियांविषयक कार्य करणाऱ्या संघटना बऱ्याचदा शासकीय योजनांचा लाभ घेऊन कार्यरत राहिल्या.

## :जीवनावश्यक वस्तूसाठीच्या चळवळी :-

१९७० चे दशक आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थित्यंतराचे दशक होते. दुष्काळ, महागाई, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई यामुळे मध्यम वर्गीय महिलांनी महागाई विरोधात आंदोलन सुरु केले. मुंबईत समाजवादी महिला सभा व इतर संघटना एकत्र आल्या व त्यांनी १३ ~~अक्ट~~ सप्टेंबर १९७२ ला महागाई प्रतिकारक संयुक्त महिला समिती स्थापन केली. त्यामध्ये अहिल्यादेवी रांगणेकर, कमल देसाई, मालती बेडेकर व कृष्णाबाई मोटे या स्त्रिया आघाडीवर होत्या. या चळवळीने अत्याचार व घातक प्रथा या विरोधी निदर्शने केली. १९७५ हे जागतिक महिला वर्ष व १९७५ ते १९८५ हे जागतिक महिला दशक म्हणून घोषित करण्यात आले.

# स्त्रियांच्या समस्यावरील स्त्रियांच्या चळवळी

१९७५ ते १९८५ या महिला दशकात क्रांतीकारी स्वरूपाच्या महिला संघटना प्रामुख्याने शहरात विकास पावल्या या स्वायत्त महिला संघटना स्त्रियांच्या वेगवेगळ्या प्रश्नावर चर्चा करून स्वायत्तपणे कार्य करतात. यांचे म्हणून काही प्रश्न असतात या प्रश्नासंबंधीही स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात चळवळी उभ्या केल्या आहेत. बलात्कार, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, कौटुंबिक छळ, सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांविरूद्धची हिंसा या विरूद्ध महिला संघटनेचे विविध गट कार्य करतात. बऱ्याच वेळेला अनेक पक्षातील स्त्रिया समान प्रश्नासाठी अशा स्वायत्त समुहामधून कार्य करतात. यामध्ये सहेली, मनुषी कार्यरत आहेत. या संघटनेच्या कार्यातून असे आढळून आले की, स्त्रियांच्या आयुष्यात त्यांच्या खाजगीत होणारे अत्याचार जास्त भयानक, घाबरून टाकणारे व दु:खद असतात.

या विविध प्रकारच्या अत्याचारा संबंधात स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समितीने मथुरा बलात्कार प्रकरणात (मार्च १९८० ला राज्यभर निदर्शने व मोर्चे संघटीत करून तिच्या मृत्यू प्रकरणी चौकशी होऊन त्या संदर्भात कायदा बनविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात व पंतप्रधानांना अवाहन केले. मंजुश्री सारडा खून प्रकरणात (१९८४) संपूर्ण राज्यातून निर्भत्सनेची व निषेधाची पत्रे मुख्यमंत्र्यांना पाठविली. रुपकुंवर सती प्रकरणानंतर (१९८७) संपूर्ण राज्यभर सतीविरोधी दिवस पाळला. या समितीमार्फत स्त्रियां-संदर्भात अनेक चर्चासत्रे व कार्यशाळा यांचे आयोजन केले जाते.

थोडक्यात या स्त्रियांच्या चळवळीने स्त्रीवर होणारा अत्याचाराच्या अनेक बाजू समाजासमोर आणल्या. कौटुंबिक हिंसाचाराला ठाम विरोध केला. तसेच कायदेशीर बाबींमध्ये योग्यतो बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी स्त्रीसंघटना एकसंघ फळी उभारली.

Scanned with CamScanner

## :- स्त्रियांसंबंधी संशोधन :-

१९८० ते १९९० च्या दरम्यान लिंगभावासंबंधीच्या विविध पैलूवर प्रकाश टाकणाऱ्या समाजशास्त्रीय साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणात टाकणाऱ्या समाजामध्ये वाढ झाली. कित्येक आलेख आणि निबंध, स्त्रियांच्या लेखनात भाषणात, सामाजिक व आर्थिक वर्तुळामधील स्त्रियांच्या स्थानावर परिणाम करणारे मुद्दे, यामध्ये स्त्री चळवळ संज्ञा स्थूलमानाने वापरतात हे करत असताना स्त्रियांचा लढा देण्यासाठी एकत्र येणे आणि स्त्रियांच्या चळवळी समानार्थी वापरले जातात. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल रिसर्च (ICSSR) ने लिंगावर आधारित अभ्यासांना एकूण कार्यक्रमामध्ये विशेष प्राधान्य दिले. विद्यापीठातही स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली.

## समाजाच्या चळवळी आणि स्त्रिया :-

समाजाच्या निरनिराळ्या चळवळीमधून स्त्रियांनी विविध प्रश्नावर लढा दिला आहे. आपले प्रश्न त्यांनी या चळवळीला जोडले आहेत. स्वातंत्र्याची चळवळ, जमातींच्या चळवळी, विद्यार्थ्यांच्या चळवळी, दलितांच्या चळवळी, पर्यावरणाच्या चळवळी अशा विविध समाजशास्त्रीय प्रश्नांनी त्यांनी स्वतःला जोडून या चळवळीत योगदान दिले आहेत. आपल्या कार्याचा ठसा त्यांनी उठवला आहे.

Scanned with CamScanner

## -: स्त्रियांचा आर्थिक विकास :-

स्त्रियांच्या सर्व दास्याचे कारण या आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर नाहीत. याचाही विचार स्त्रीवादी चळवळ करून लागल्या त्यासाठी काही गट कार्यरत आहेत. सेल्फ एम्प्लाईड वुमेन्स असोसिएशन (SEWA) वर्किंग वुमेन्स फोरम, अन्नपूर्णा महिला मंडळ इ. संस्था स्त्रियांच्या आर्थिक विकासासाठी कार्य करतात. या संस्था गरिब स्त्रियांसाठी स्वयंरोजगार निर्मितीचे कार्य करतात. स्त्रियांना आत्मनिर्भर बनवून हक्कांची जाणिव करून देतात. हे गट अधिकारहीन स्त्रियां व सहकारी संस्था यांच्यासाठी काम करतात.

## -: स्त्रियांच्या राजकीय आघाड्या :-

महिला अत्याचार पिडीत आहेत. प्राथमिक सुविधांपासून वंचित आहेत. शिक्षण, सत्ता यापासून उपेक्षित आहेत. त्यांना सत्तेच्या प्रवाहात आणण्यासाठी या संघटना प्रयत्न करतात. या आघाड्यामुळे त्यांना सुरक्षिततेचे व प्रतिष्ठेचे वातावरण मिळते. देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष कांग्रेसची महिला आघाडी इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली सन १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने अखिल भारतीय महिला कॉंग्रेस या संघटनेची स्थापना केली. भारतीय जनता पार्टीने महिला मोर्चा नावाचे संघटन उभे केले. शिवसेना पक्षानेही आपली महिला आघाडी स्थापन केली. भारतीय रिपब्लीकन पक्षाने भारिप बहूजन महासंघ महिला आघाडीच्या नावाने स्थापना केली.

या संघटना त्या त्या पक्षाच्या सैद्धांतिक आणि वैचारिक काम करीत असल्याने व पक्षीय धोरणाला प्राधान्य दिल्याने त्या अखिल भारतीय स्त्रियांचे नेतृत्व समर्थपणे पेलू शकत नाहीत.

Scanned with CamScanner

# ऋणनिर्देश

आम्ही आपल्या कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज येथे B. A भाग III (इतिहास विभाग) (सन 2015-16 या वर्गात शिकत असून इतिहास विषया अंतर्गत असलेले "स्त्री चळवळ" हे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करत असताना आम्हाला आमचे विषय शिक्षक प्रा. श्री. आर. एम. घार्गे व प्रा. श्री. व्ही. बी. गुजर यांनी योग्य मार्गदर्शन केले. तसेच प्रा. एल. जी. जाधव यांनी देखील बहुमोल मार्गदर्शन केले. त्याबद्दल गट क्र. २ ची गटप्रमुख या नात्याने आमच्या गटातील सर्व विद्यार्थ्यांमार्फत मी कुमारी लोहार पूजा विष्णू । आपण सर्वांचे मनापासून आभार मानते आम्ही सर्वजण त्यांचे ऋणी आहोत.

